**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

**मासं/रवका/न.क्र.०५/१११४९**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmhrmsedcl@gmail.com
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. ०२२ - ६९४२५१४१
दिनांक: **३०.०३.२०२६**

# प रि प त्र क

**विषय**: सन-२०२६ या वर्षाकरिता एम्प्लॉई पोर्टलव्दारे विनंती बदली अर्ज सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत.

**संदर्भ:** १.प्रशासकीय परिपत्रक क्र.५१४ दि.१०.०८.२०१५.
२.प्रशासकीय परिपत्रक क्र.६६७ दि.१३.०३.२०२४.
३.परिपत्रक क्र.मासं/रवका/न.क्र.०५/०७१८६ दि.०३.०३.२०२५.
४.प्रशासकीय परिपत्रक क्र.६९२ दि.०९.०४.२०२५.
५.परिपत्रक क्र.मासं/रवका/न.क्र.०५/०८२८९ दि.०६.०३.२०२६.

*****

कंपनीमध्ये कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता दरवर्षी सर्वसाधारण बदलीबाबतचे धोरण राबविण्यात येते. या धोरणांतर्गत बदलीकरीता इच्छुक असलेल्या कर्मचाऱ्यांना एम्प्लॉई पोर्टलद्वारे विनंती बदलीसाठी अर्ज सादर करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

२. या अनुषंगाने संदर्भ क्र.५ मधील परिपत्रकाव्दारे, सन २०२६ करीता विनंती बदली अर्ज सादर करण्यासाठी दिनांक **३१ मार्च २०२६** पर्यंत मुदत देण्यात आली होती व सादर केलेले विनंती बदली अर्ज रद्द करण्याची अंतिम तारीख **१५ एप्रिल २०२६** अशी निश्चित करण्यात अलेली आहे. तथापि, माहे मार्च-२०२६ हा सध्याच्या वित्तिय वर्षाचा अखेरचा महिना असल्याने या महिन्यात कंपनीचे महसूल उद्दीष्ट पूर्ण करण्याच्या अनुषंगाने सर्व अधिकारी व कर्मचारी वीज देयकांची थकबाकी वसुलीच्या कामकाजासाठी युध्दपातळीवर कार्यरत होते. वसुलीसारख्या अत्यंत महत्वाच्या कामात व्यस्त असल्याने काही अधिकारी व कर्मचारी विहित मुदतीत विनंती बदली अर्ज सादर करू शकले नाहीत.

३. उपरोक्त परिस्थिती विचारात घेउन विनंती बदली अर्ज सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्याची बाब विचाराधीन होती, यास्तव संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना त्यांचे विनंती बदली अर्ज एम्प्लॉई पोर्टलद्वारे सादर करण्याकरीता दिनांक **०८ एप्रिल २०२६** पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. सबब, नियंत्रण अधिकारी यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखाली कार्यरत असणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**( भूषण कुलकर्णी )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**
१) संचालक (वित्त)/(संचलन)/(प्रकल्प)/(वाणिज्य)/(मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय,मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
३) कार्यकारी संचालक (सुवअं)/(मासं)/(पायाभूत आराखडा/विशेष प्रकल्प)/(देयके व वसूली)/(वितरण)/(माहिती तंत्रज्ञान)/ (वित्त व लेखा) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय,मुंबई.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/ मुख्य विधी सल्लागार/मुख्य तपास अधिकारी/ कंपनी सचिव म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय,मुंबई.

२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या,नाशिक.

३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या.,मुंबई.

४) सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई. (सांघिक कार्यालय/क्षेत्रीय कार्यालय)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/(मासं-मासंव्यप्र)/(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय,मुंबई.

२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय,मुंबई.

३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी,म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय,मुंबई.